सन १८९३

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
क्र. नं. १६५


[illegible]

...रीत आर...

अथवा.

...र गणपतीचीं पदें.



नं 2०६
म. ग्रं. सं. ठाणें २०६

| विषय | |
|---|---|
| काव्य | |
| संग्रहालय क्रमांक | |
| १६५ / ८ | |

लेखक कृ. ग. अभ्यंकर

सन १८९३

पुस्तकाचें नांव संगीत आरत्या

Gratis

॥ श्रीगजानन. ॥

हें पुस्तक तीर्थरूप राजश्री गणेश जगन्नाथ अभ्यंकर यांस नम्रतापूर्वक परमप्रेमादरानें अर्पण केलें असे.

कृष्णाजी गणेश अभ्यंकर.

वा. ग्रं. ९५८

# प्रस्तावना.

अलीकडे संगीत नाटकांचा प्रसार झाल्यापासून पुरातन नांवाजलेल्या कवींच्या पद्यांविषयीं लोकांची गोडी कमी होऊन संगीत नाटकांतील कविता म्हणण्याकडे त्यांचें लक्ष बरेंच गेलें आहे. आणि हीं नाटकें बहुधा शृंगार रस प्रधान असल्यामुळें व त्यांतील कवितांच्या चाली अनेक वेळां ऐकून त्याबरोबर म्हणतां येत असल्यामुळें त्यांची विशेष गोडी लागणें हें साहजीकच आहे. तथापि आपल्या स्थितीचें स्वरूप लोकांस कळावें व जास्त सद्बोध व्हावा या हेतूनें संगीत नाटकांतीलच पदांचे चालीवर बोधपर पदें रचून परमेश्वर स्तवनास व गायनासही योग्य असें हें पुस्तक माझ्या अल्प मतीनें लोकोपयोगार्थ केलें आहे. इष्ट हेतु कितपत साधला हें पाहणें वाचकांकडे सोपवितों.

कृ. ग. अ.

॥ श्री ॥

## भुजंगप्रयात.

जना प्रार्थिमी अल्पबुद्धी सुभावें
स्वयेंगायिलें गीत अंग स्वभावें ॥
नसे मी पटूगानिं ज्ञाता कवीही
असें जाणुनी लक्ष द्या अर्थडोहीं ॥

ना. १५५

३

## पद १ राग-खमाज. ताल-धुमाळी

चाल-पंच तुंड नर रुंड मालधर-

एकदंत शिवतनय गजानन मंगळमूर्ती गणराया ॥
ओवाळितसे आरति तुजला यावें मजला ताराया ॥ ए ॥
मयुरेशा तूं तारक असशी प्रेमळभाविक भक्तांचा ॥
त्रिविधताप तूं हरण करिशिबा जगता दुखवी जो साचा ॥
दीनजनावरि सदय होउनी नाशकरिशि क्षणीं विघ्नांचा ॥
गौरिनंदना असशी दयानिधि कैवारी तूं जगताचा ॥ १ ॥
दुष्टराक्षसां नाशायासी अवतरलासी या जगतीं ॥
मूढजनातें सुबुद्धकारिशी म्हणुनी जनबहु तुज पुजिती ॥
रिद्धिसिद्धि या अष्टनायिका लीन तुझ्याबापादीं असती ॥
चिंतामणि तूं सिद्धि विनायकगानीं द्यावी मजस्फूर्ती ॥ २ ॥

## २ रें राग चाल-अष्टमूर्ति परमेश-

मंगलमूर्ति प्रणतवत्सला ओवाळूं भावें ॥
भक्तजनातें प्रसन्न होउनि निर्भय राखावें ॥ मं ॥
पंचारति ही देखुनिदेवा संतुष्ट व्हावें ॥
प्रेमभरानें वरदहस्त ते मजवरि ठेवावे ॥
कृपाळोभतव सदाराखुनी आम्हां रक्षावें ॥
दीनवदानें हें तुजसि मागतों अशंक तें द्यावें ॥

### ३ रें राग पिलू ताल धुमाळी.

चाल—सगुणचरित्रें परम पवित्र —

सगुणरूपतें किरिट मस्तकीं रत्नखचित जाणा ॥
तिलकयुक्त गजवंदन दिव्य तें पूर्ण ध्यानिं आणा ॥ स. ॥
शुंडा ज्याची वेलि जणुं कीं पसरे उदरावरी ॥
दंतशुभ्र अति दोबाजूंनीं खुलती फुलांपरी ॥ १ ॥
कानिंकुंडलें रत्नजाळि बहु तेजा धरितिपरी ॥
पाणिदार ते नेत्र विलक्षण दृष्टी क्षिप्र हरि ॥ २ ॥
मौक्तिकमाला हेमपदकसह बहुतचि सुलतिगळां ॥
चतुर्भुजतो कृपालु गणपति धरितो आयुधांला ॥
हस्त पाद कटि तोडे भूषित देती शोभेला ॥
कटिपासुनिया दिव्यपितांबर रचवी तो तनुला ॥ ४ ॥
गजानना तव चरणिं लागतों धरुनी भावाला ॥
गणेशसुत कृष्णा पावुनि घे त्वें सुयशाला ॥ ५ ॥

### ४ थें राग काफी ताल दीपचंदी.

चाल—भोलानाथ दिगंबर.

मजला सदय तूं पाहीं ॥ गिरिजासुत वर देईं ॥ मजला ॥
वरद तुला रे जग म्हणतें जें मदनुभवासि न येई ॥ १ ॥ गि.
भवजलधीचि दुःखें येती सुखसागरिं मज नेईं ॥ २ ॥ गि०
दुर्बुद्धीनें मन हें चळतां सद्बुद्धि दे गजदायीं ॥ ३ ॥ गि०

वा. क्र. १५५



### ५ वें चाल–कृष्णगडी आपुला

निष्ठापाहुनि भक्ताची इच्छा पुरवीरेसाची ॥ नि०॥
इष्टमित्र सुत पत्नि असावीं सकलही नीतीची ॥१॥ इच्छा
धनधान्याची वृद्धि असावी सुबुद्धि धर्माची ॥ २ ॥ इच्छा
सुसंगती ही जडो सर्वदा आवाडे भक्तांची ॥ ३ ॥इच्छा
गजानना हे बोलबोलतों बोलविशी तूंची ॥ ४ ॥ इच्छा

### ६ वें राग आनंदभैरवी ताल दादरा.

चाल नको नको स्त्रीसंग—

कामवासना पुरेति दुःख देइरे ।
जळिपडती कितिक इचे मुखीं पाहिरे ॥ का०
क्षणिक सुखा भुलुनि मूढ तिजसि अकळिती ॥
वीष परी सत्य तिला क्षण न जाणती ॥
प्राणासम सुनितीची आहुति घाळिती ॥
सदय असा होउनि जग कारि सुजाणरे ॥१॥ का०
उडि टाकुनि ज्योतिवरी नाश पावतो
जेवि अंध या पतंग असुनि दृष्टितो
तेवि दशा विषयि मनुज खचित पावतो
ह्मणुनि तुला विनवी मी नीति शिकविरे ॥२॥ का०

### ७ वें चाल–पेल कुसुंबी दुस्तर शेला.

राग पिलु ताल धुमाळी.

षड्रिपु मजला बहू गांजिती ते नानापरीचे ॥

काम क्रोध लोभ मोह मद मत्सर हे साचे ॥ षड्रिपु०
एका ग्राहि ते जमती जेव्हां देती दुःखें जीं ॥
वदवे मजला न कधीं तीं हो दुःसह देवाजी ॥
एकाहुनि ते एक घोर हो अनुभवितों सहजीं ॥
त्यानीं आणा सदय होउनी बोले जे वाचे ॥१॥षड्रि.
कितिक लोक ते बाळि घेती जे त्यावरि प्रिति करिती
स्वागतयांचा करिती त्यांना बहु नमुनी असती ॥
विघ्नहरा षड् विकार यांना पळवि अशी शक्ती ॥
द्यावी मजला तरिच होइल सार्थक जन्माचें ॥२॥षड्रि०

॥ ८ वें. ॥

चाल—झाली ज्याची उपवर दुहिता.
सांग प्रभो मनसाठिं दयाळा कवणो पायाचि ॥
दुःख नमाया ॥ सांग. ॥
राव रंकीहि अखिल जगत हें ॥
चुकति कदापि न तें भोगाया ॥ १ ॥ सांग०
द्रव्य वस्तु ती प्राधान्यही जरि
न शके त्यातें कनुक शमाया ॥२ ॥ सांग०
क्षणोक्षणीं हे सुखदुःखाचे ॥
फेरे येती तुझिही माया ॥ ३ ॥ सांग०

वा-व्या. १८८



### ९ वें. राग काफी ताल दीपचंदी.

नियम कसे पाळावे—
देवा सुनितीचे, तें शिकवावें ॥ नियम ॥
द्रव्या देखुनि लोभचि सुटतो ॥
काय तुला सांगावें ॥
लोभा योगें मानचि जावें ॥ १ ॥ नियम
परकल्याणें मत्सर येतो ॥
असमाधानाचें व्हावें ॥
मग झुरण्यानें दुःखि पडावें ॥ २ ॥ नियम
सुंदर वस्तू मोह पाडिते ॥
सत्य तें सोडावें ॥
भ्रम होउनियां सत्व हरावें ॥ ३ ॥ नियम
अनिष्ट घडतां क्रोधाचि यावा ॥
कर्तव्या विसरावें ॥
मग कुफलातें हो भोगावें ॥ ४ ॥ नियम

### १० वें राग कालिंगडा ताल धुमाळी

चाल—बघुनि उपवना विरहाग्नीची—
या संसारीं बिकट सागरीं क्षण सुखकाभाला ॥
संतति संपति सद्गुण शक्ति अवश्य पुरुषाला ॥
कांता जरि ती आज्ञाधारक तोषि तरी पतिला ॥
पुत्र असा अणी सद्गुणि थोरही योग्यचि जनकाला ॥

बंधू प्रेमळ शांत जाणता आधार बंधूला ॥
परिचारकही दक्ष असावे सेवाया प्रभुला ॥
चाल—या विरहित पृथ्वी शून्याचि खरी ॥
त्या जना मिळेना सुख अंतरीं ॥
भवदुःख भार उलटा पडतो वरी ॥
चाल पहिली—मधुर भाषिणी परिसद्गुणी ज्ञानी पत्नी ज्याला
समयिं लाभली सुखानुभव तो मिळेल ही त्याला ॥
ऐसे माझे विचार सादर कथितों मी तुजला ॥
ध्यानीं ध्यावे जन तोषावे मानुनि माझ्या शब्दाला ॥

॥ ११ वें ॥

चाल—सगुण चरित्रें परम पवित्रें सादर वर्णावीं.
तारि तारि तूं हेरंबा मज वाट किती पाहसी ॥
हात देई मज भवसागरिं या वारि विघ्नांसी ॥ ता० ॥
इष्टमित्र गणगोत सोयरे येती खायासी ॥
संकट पडल्या दूर पळति ते हाल पहायासी ॥ १ ॥
सुतदारा हीं ऐश्वर्यामधिं प्रेमळ जाशि भासतीं ॥
ऐश्वर्याचा अभाव होतां प्रेम कमी करिती ॥ २ ॥
लक्ष्मीपासुनी सुखें सर्वही मिळती हें जाणुनी ॥
तिजवरि लोभा केल्या तरि ती जाइ दुरी पळुनी ॥३॥
मग आठवावें त्वादितर कवणा सांग मला देवा ॥
साम्य तुला ते धर्मनीतिची करिती जे सेवा ॥ ४ ॥

## १२ वें राग जोगी — ताल कुमारी.

चाल—माझा कृष्ण देखिला काय.

नकळे जगस्थिति काय अशी देवा सांगावें ॥नकळे॥
सौख्याचीही बहुतचि वाण भासे सकलां ठायीं जाण ॥
कोणामध्यें नाहीं त्राण पोशिति प्राण अति कष्टें॥ १ ॥नकळे
राखिति जन बहु दुष्ट स्वभाव धरिति न देवाठायीं भाव॥
लिहिण्याही पूर्ण अभाव एका ठायीं कांहिंकिंहो ॥२॥ नकळे
गजानना तुज विनवी दास माझी तुजवर सर्वहि आस ॥
बुद्धिदाता असशी खास स्थितिही उदास नच रहावी॥३ नकळे

## १३ वें राग बिहाग — ताल दादरा.

चाल—हरिभजनाविण काळ घालवूं नकोरे.

विघ्नहरा तुजला मी सेवि भक्तिनें ॥ वि० ॥
परि नाहीं ज्ञान मला । अनुकूल तुज करण्याला ॥
मार्ग नसे शिकण्याला । तव कृपेविणें ॥ १ ॥ वि०
साधूजन चित्तवृत्ति । निर्मल बहु केवि करिती ॥
न कळे मज सत्य रितिं। कळवि मागणें ॥ २ ॥ वि०

## १४ वें राग झिंजोटी — ताल त्रिताल.

चाल—वस्त्रानें देह सारा.

गजवदना मयूरेशा हेरंबा गणपती ॥
पूजी मी तुजलागीं बुद्धी दे मजप्रती ॥गजव०॥
मंगलमूर्ति दिव्य आनंदा देतसे ॥

भक्तांचे इष्टहेतू पुरविण्या झटतसे ॥
आनंदि दृष्टिशांत प्रेमानें बघतसे ॥
रुप तैसें मनावेधी आवडतें फारसें ॥ गजव० ॥

१५ वें राग ब्याहाग — ताल दादरा.

चाल—अभिनव मधुलोलुपहे.

किति भजुं तुज मयुरेशा सांग तू मसी ॥ कि० ॥
बहु थकलों तुज गाउनी जाइ आस सोडूनी ॥
घे सकलहि हें स्वमनीं किती थांबसी ॥ १ ॥ कि०
मनुज देह सर्वश्रेष्ट श्रुति स्मृति हें वदाति स्पष्ट ॥
अज्ञजना भक्तिइष्ट तूंहि जाणसी ॥ २ ॥ कि०
श्रद्धा तुज ठायिं मोठी जागे ही सत्य गोष्टी ॥
फळ देइं यासाठीं काय पाहसी ॥ ३ ॥ कि०

१६ वें.

चाल—जनहो श्रीपादपदीं मन ठेवा.

कितिही गणपतिची ध्यावी मूर्ति-स्मरतां ये स्फूर्ति ॥
गुण हे गाउनिया प्रेमळभावें करितों पंचारति ॥ कि० ॥
त्यानें दिधली ही स्तवना वाचा ज्ञानमार्ग साचा॥
वदते हाही लोभ तयाचा भक्तांवरि पारेचा ॥
होवो त्याच्या प्रसाद करिचा हेतू सर्वांचा ॥
पुरवी आतां—गणनायक तुज उशिर कशाचा,
हें जन वदती ॥ १ ॥ कितिही गण०

दी-को-४६१०



प्रभुनें संकट भय कितिकांचें हारिलें ज्यांनीं त्यां पूजिलें ॥
तैसें कितिकां बहु ज्ञानी केलें, कीं ध्यानीं ध्यायिलें ॥
नाना रीति आणिकां सुखिही केलें, कीं तद्रूप केलें ॥
त्यानीं आशा-संशय फेकुनि अनुभव घ्यावा,
करुनी सत्कीर्ती ॥ २ ॥ कितिही गण०

## राग पिलू--ताल धुमाळी.

चाल-बकसागर तुम्हि वीरशिरोमणि.

सदय हृदय तुम्हि वरदानीं पटु वाट काय पाहतां ॥
आशा धरुनी बसलों तुम्हांवरि स्तुती पाठ करतां ॥ स. ॥
लक्ष लाविलें चातक जेंवि वरबिंदू करितां ॥
निराश झालों थकुनी गेलों मयुरेशा गातां ॥
किति तरि श्रमवुनी प्राणा माझ्या कासाविस करतां ॥
नका पाहुहो अंत असा कीं ताराया पतिता ॥ स. ॥ १ ॥

## १८ वें. राग आनंदभैरवी--ताल दादरा.

चाल-दैवयोग दुर्विपाक आजि जाहला.

मीन जेवि अंबुमाजि तेवि तृप्तलों ॥
लीन दीन होउनि तद्रूप पावलों ॥ मीन. ॥
गणनायक नाम तया सत्य शोभतें ॥
प्रीति गणावरिच खरी प्रेम वाढतें ॥
भिन्न भाव नसुनि एक रूप भासतें ॥
धन्य जगतिं मातृउदरिं योग्य जन्मलों ॥ मीन ॥ १ ॥

## १९ वें. राग झिंजोटी---ताल त्रिताल.

चाल-रुचती कां तीर्थ यात्रा.

नयनीं ती भव्यमूर्ती ठसलीहो कितितरी ॥
राहो ही पूर्णतेशीं मत्हृदयामांतरीं ॥
सुमना तूं नको सोडूं जिवं गेला हा जरी ॥
किति सौख्या अनुभवावें प्रेमळ या अंतरीं ॥ न. ॥ १ ॥

## २० वें. राग कालंगडा - ताल धुमाळी.

चाल-बघुनि उपवना विरहामीची.

निरखुनि बघतां रूप मनोहर गहिंवर ये दाटुनी ॥
प्रेमळ भावा धरुनी स्तविल्या यशनिधि पसरे क्षणीं ॥ नि. ॥
अष्टसिद्धि त्या दासी ज्याच्या चरणीं कर जोडुनी ॥
गणनगांच्या भजनीं रंगतो प्रसन्न तो चिंतामणी ॥
सेवा ज्याचें अति प्रिय पोषय भक्तांचेंअसुनी ॥
रम्य तयांमधिं दंग जनांला करितो वरदानीं ॥
चाल-त्या नसे लहान थोर कांहीं तरी ॥
त्या आवडे जो बहु भक्ती करी ॥
तो ठेवि किती प्रेमाहि भक्तांवरी ॥

सर्व स्थितिही पाहूं जातां भाव उपजतो मनीं ॥
मजला नाहीं भान राहिलें गणपतिच्या स्तवनीं ॥

२१. वें

चाल—सुंदर मुख तुंदिलतनु नंदिकेश्वरा.

लंबोदर गणराया गौरिबालका ॥
गजमुखधर मयुरेश्वर सिद्धिदायका ॥ लं० ॥
दीन भक्त तुजला मी नित्य प्रार्थितों ॥
तुजवरतें प्रेम धरुनि भाव राखितों ॥
संकटभय हरण्याला बहुत विनवितों ॥
वारी—हारी—सारी
भवभीती दुःखद ती । सत्वरिती हे विनायका ॥ १ ॥ लंबो०
संकटहर असशी तूं खचित जाणतों ।
म्हणुनि तुझें स्तवन करुनि नित्य पूजितों ।
दोहस्तें नमन करुनि चरणीं लागतों ।
स्वमनीं—आणी—मानी
या स्तवना, तव पुजना गजवदना भक्तपालका ॥ २ ॥ लं०

कटाव.

एका साधूचा उपदेश.

जडवीं अंगीं सुजन लक्षणें, खरें बोलणें धर्म पाळणें ॥
सत्कीर्तीतें ठेवुनि जाणें । क्षणिक सुखाला कधीं न भुलणें ॥
षड्रिपुपासुनि दूर रहाणें । जगमान्य अशीं कृत्यें करणें ॥

ज्ञानाहुनि बहु नीति मानणें । कुलमर्यादा कधिं न सोडणें ॥
विचारविरहित कृत्य न करणें । सत्संगतिही अवश्य धरणें ॥
समाधानि बहु नित्य रहाणें । पोषकाशीं बेइमान जाण ॥
न करी तुज तव दैवत आण । निजधर्मानें करीं वर्तन ॥
भावें करि बा ईशस्मरण । सदा मनीं तद्ध्रही मान ॥
पोषक आज्ञे व्हावे लीन । जग येणें तुज मानि न हीन ॥
परिमित घ्यावें नित्य भोजन । ख्यालि न करणें करुनी ऋण ॥
सत्कार्यामाधें घ्यावा शीण । पशुसम विषयीं न घालवी भान
ऐसे पाळी बहु सद्‌गुण । जाणे वंद्य जनाचें हे खूण ॥
करूनी मनन । ध्यानीं ठेवी हें सद्वचन ॥

समाप्त.